सं.फौ.ख.क्र.१६६/२०२३
सरकार वि.नंदलाल
नि.क्र.११ च्या खाली

साक्षीदार क्र **०५** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–दुर्गेश्वर चिंधुजी बेलसरे,
वय २४७ वर्ष, व्यवसाय–शेती,
राह.अंतरगाव, ता.समुद्रपुर, जि.वर्धा.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू**

१. घटनेच्या वेळी मी माझ्या गावामध्ये होतो. त्यानंतर मला गावात माहिती पडले की, सागर खडसे याचा अपघात झालेला आहे. त्यानंतर मी व माझा मित्र हे घटनास्थळावर गेलो. त्यावेळी पोलिसांनी विचारले की, गावचे कोण आहे त्यावेळी आम्ही सामोर गेलो. त्यानंतर पोलिसांनी आम्हाला सांगितले की, सह्या करा. आम्ही घटनास्थळावर पाहिले असता आम्हाला मयत सागर खडसे हा उजव्या हातावर पडून असल्याचे दिसले. तसेच त्याच्या मो.सा. चे तुकडे साईडला पडुन होते व त्याच्या डोक्याचे रक्त तेथे सांडून होते. अपघात कोणी केला, कसा झाला याबाबत मला माहिती नाही.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताची माहिती झाल्यानंतर मी घटनास्थळावर गेलो. हे म्हणणे खरे आहे की,घटनास्थळावर गेल्यानंतर मला माहिती पडले की, बोलेरो चारचाकी वाहण क्र.एम.एच.४० के.आर.८१२१ च्या चालकाने अपघात केला, तसेच त्याने त्याच्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अपघात केला. हे म्हणणे खरे आहे की, सदर बोलेरा वाहनचालकाच्या चुकीमुळे अपघात झाल्याने मयत सागर खडसे याचा मृत्यू झाला. मी आरोपीला ओळखत नाही.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड. पि.वाय.सुखदेवे यांनी नि.क्र.२० वर मेमो दाखल केला त्याप्रमाणे यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरू.**

३. पोलिसांनी माझे बयाण घेतले नव्हते. माझ्या गावावरून घटनास्थळावर पोहोचण्यासाठी मला अर्धा तास लागला. मी पोलिसांना बयाण देतेवेळेस 'मी व माझा मित्र हे घटनास्थळावर गेलो, त्यावेळी पोलिसांनी विचारले की, गावचे कोण आहे त्यावेळी आम्ही सामोर गेलो, त्यानंतर पोलिसांनी आम्हाला सांगितले की, सह्या करा, आम्ही घटनास्थळावर

पाहिले असता आम्हाला मयत सागर खडसे हा उजव्या हातावर पडून असल्याचे दिसले' ह्या बाबी मी पोलिसांना सांगितल्या नव्हत्या. ज्या व्यक्तीकडून मला अपघाताबाबत माहिती मिळाली त्याचे नाव पोलिसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदर बोलेरो वाहन कोन चालवित होते याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर बोलेरो वाहन होती की, इतर वाहन होते त्याबाबत माहीती नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदर अपघात करणारे वाहन हे बोलेरो वाहन होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपघात कोणत्या व्यक्तीने केला हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मयत सागर खडसे हा माझ्याच गावचा रहीवासी होता. हे म्हणणे खरे आहे की, मयत सागर खडसे याचे वडील दिवाकर खडसे याच्यासोबत माझे चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिवाकर खडसे यांच्यासोबत माझे चांगले संबंध असल्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.११.०२.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड